**<u>ठळक बातम्या</u>**

- संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाचा पहिला टप्पा संपन्न /दोन्ही सभागृहांचं कामकाज येत्या ९ मार्चपर्यंत स्थगित

- लोकसभेतले विरोधी पक्षनेता राहुल गांधी यांच्याविरोधात हक्कभंग ठराव आणणार नसून, निशिकांत दुबे यांनी मांडलेल्या सबस्टँटीव्ह ठरावावर सभापतींशी चर्चा करुन निर्णय घेणार असल्याचं संसदीय कार्यमंत्र्यांचं स्पष्टीकरण

- रेडियो दिनानिमित्त सर्वत्र विविध कार्यक्रम

- बांगलादेशात तेराव्या संसदीय निवडणुकीत बांगलादेश नॅशनलिस्ट पार्टीची निर्णायक बहुमताकडे वाटचाल, दोन तृतीयांश बहुमताचा आकडा ओलांडला

**आणि**

- माजी केंद्रीय कृषी राज्यमंत्री आणि रेल्वेमंत्री कान्हू चरण लेंका यांचं निधन

**<><><><><>**

संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या पहिल्या टप्प्याच्या कामकाजाचा आज अखेरचा दिवस होता. आजच्या शेवटच्या दिवशीही लोकसभेत विरोधकांनी विविध मुद्द्यांवरून गदारोळ केल्याने स्थगित करण्यात आलं. असून दुसऱ्या टप्प्याचं कामकाज ९ मार्चला सुरू होणार आहे.

लोकसभेत आज सकाळी कामकाजाला सुरुवात झाली तेव्हा पीठासीन अधिकारी संध्या राय यांनी माजी खासदार दिवंगत भगवानदास राठोड यांच्या निधनाबद्दल शोकप्रस्ताव मांडत सभागृहात दोन मिनिटांचं मौन पाळून राठोड यांना आदरांजली वाहण्यात आली. त्यानंतर सभागृहात प्रश्नोत्तराच्या तासाला सुरुवात झाली तेव्हा कोडीनयुक्त कफ सिरीप घेतल्यानं झालेल्या दुर्घटनेची कोणत्याही राज्यात नोंद झालेली नाही. त्यामुळे याप्रकरणी नुकसानभरपाई देण्याचा प्रश्नच

उद्भवत नसल्याचं सांगितलं. त्यानंतर काँग्रेस, तृणमूल काँग्रेस, डीएमके सह अन्य विरोधी पक्षाच्या सदस्यांनी सभागृहात मधोमध येत घोषणाबाजीस सुरुवात केली. पीठासीन अधिकाऱ्यांनी विरोधकांना जागेवर जाऊन बसण्याच्या सूचना देऊनही हा गोंधळ सुरूच राहिला. त्यामुळे सभागृहाचं कामकाज दुपारी १२ वाजेपर्यंत स्थगित झालं. पुन्हा एकदा सभागृहाच्या कामकाजाला सुरुवात झाली तेव्हा विरोधकांनी पुन्हा घोषणाबाजी सुरु केल्यानं पीठासीन अधिकाऱ्यांनी सभागृहाचं कामकाज ९ मार्चपर्यंत स्थगित केलं.

**राज्यसभेतही** अर्थसंकल्पीय अधिवेशनच्या पहिल्या सत्राच्या अखेरच्या दिवशी सदस्यांनी विविध दस्तऐवज  सभागृहाच्या पटलावर मांडली. राज्यसभेचे अध्यक्ष उपराष्ट्रपती सी.पी. राधाकृष्णन यांनी राष्ट्रपतींचा संदेश सभागृहात वाचून दाखवला. २८ जानेवारी रोजी दोन्ही सभागृहांच्या संयुक्त अधिवेशनात केलेल्या अभिभाषणाबद्दल राज्यसभेच्या सदस्यांनी व्यक्त केलेल्या आभारदर्शक प्रस्तावाची नोंद राष्ट्रपतींनी घेतल्याचं संदेशात नमूद केलं. यानंतर सभागृहात शून्य प्रहर घेण्यात आला. यावेळी विविध राजकीय पक्षांच्या सदस्यांनी अध्यक्षांच्या परवानगीनं तातडीच्या महत्त्वाच्या मुद्द्यांवर मतं मांडली. त्यानंतर राज्यसभेचंही कामकाज ९ मार्चपर्यंत तहकूब करण्यात आलं.

**<><><><><>**

लोकसभेतले  विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्याविरुद्ध भाजप खासदार निशिकांत दुबे यांनी मांडलेला वेगळा सबस्टँटिव्ह ठरावावर सभापतींशी चर्चा केल्यानंतर पुढील कारवाई केली जाईल, अशी माहिती केंद्रीय  संसदीय कार्यमंत्री किरन रिजिजू यांनी आज बातमीदारांना दिली. हा ठराव विशेषाधिकार समितीकडे पाठवायचा की नितीमूल्य समितीकडे द्यायचा की थेट सभागृहात चर्चेसाठी आणायचा याबाबत लवकरच निर्णय घेतला जाईल, असंही रिजिजू यांनी सांगितलं.

संसदीय नियमांनुसार कोणताही खासदार ठराव मांडू शकत असल्यानं दुबे यांनी वेगळा सबस्टँटिव्ह ठराव मांडला आहे. त्यामुळे सरकारने राहुल गांधी यांच्याविरुद्ध प्रस्तावित हक्कभंग ठराव सभागृहात न आणण्याचा निर्णय घेतल्याचं रिजिजू यांनी सांगितलं. राहुल गांधी यांनी आपल्या अर्थसंकल्पीय भाषणात अप्रकाशित पुस्तकाचा संदर्भ देत आणि सरकारला आक्षेपार्ह वाटणाऱ्या काही टिप्पणी करून संसदीय नियमांचे उल्लंघन केल्याचं रिजिजू यांनी सांगितलं. अर्थसंकल्पीय अधिवेशनात राहुल गांधी यांनी  प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचा संदर्भ देताना “देश बिक गया” असे शब्द वापरले, जे सरकारच्या मते अयोग्य आणि असंसदीय असल्याचं रिजीजू यांनी यावेळी सांगितलं.

**होल्ड बाईट**

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते  आज नवी दिल्लीत सेवा तीर्थ या नवीन सरकारी कार्यालयांच्या संकुल परिसराचं अनावरण आणि कर्तव्य भवन एक आणि दोनचं लोकार्पणही करण्यात करण्यात येणार आहे. सेवा तीर्थ संकुलात, प्रधानमंत्री कार्यालय, राष्ट्रीय सुरक्षा परिषद सचिवालय आणि कॅबिनेट सचिवालय आहे. हे नवीन संकुल आधुनिक सोयी-सुविधांनी सुसज्ज आहे. कर्तव्य भवन-1 आणि 2 मध्ये अनेक प्रमुख खात्यांची कार्यालयं आहेत.

**<><><><><>**

केवळ आवाजाच्या माध्यमातून जग जोडणाऱ्या प्रसारण कर्मींबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी १३ फेब्रुवारी हा दिवस दरवर्षी रेडियो दिवस म्हणून साजरा केला जातो. स्पॅनिश रेडियो अकादमीच्या विनंतीवरुन नोव्हेंबर २०११ मधे युनेस्कोने हा निर्णय घेतला, आणि डिसेंबर २०१२मधे संयुक्त राष्ट्रांच्या आमसभेने त्यावर मोहोर उमटवली. रेडियो तंत्रज्ञानाला डिजिटल तंत्रज्ञानाची आणि इंटरनेटची जोड मिळाल्यावर आवाजाचं हे माध्यम अधिकाधिक श्रोत्यांपर्यंत पोहचत आहे.  कृत्रिम

बुद्धिमत्तेचा या माध्यमातला वापर हे साधन राहील, ते मानवी आवाजाची जागा घेऊ शकणार नाही अशी यंदाच्या रेडियो दिनाची संकल्पना आहे. सार्वजनिक प्रसारण सेवेत ज्ञान, माहिती आणि मनोरंजनाचं माध्यम म्हणून आकाशवाणी गेली अनेक वर्ष चोख कामगिरी बजावत आहे.   आकाशवाणीच्या वतीने छत्तीसगडमध्ये रायपूर इथं आज जागतिक रेडिओ दिन परिसंवादाचं आयोजन करण्यात आलं आहे. आकाशवाणी मुंबईच्या सभागृहात व्हॉक्स अँड व्हाईब्ज हा पाश्चात्य संगीताचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. छत्रपती संभाजीनगर इथले रेडिओ प्रेमी संजय पवार यांनी आज रेडिओ प्रदर्शन आयोजित केलं आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी रेडिओ दिना निमित्त शुभेच्छा दिल्या आहेत. रेडिओ हे दूरदूरच्या गावांपासून शहरांतल्या लोकांपर्यंत आवाज पोहचवण्याचं  माध्यम असल्याचं प्रधानमंत्र्यांनी म्हटलं आहे.

**<><><><><>**

बांगलादेशात झालेल्या तेराव्या राष्ट्रीय संसदीय निवडणुकीत बांगलादेश नॅशनलिस्ट पार्टीने आघाडी घेतली असून दोन तृतीयांश बहुमताचा आकडा ओलांडला आहे. त्यामुळे आता पक्षाकडून सत्ता स्थापन करण्याचा दावा करण्यात येईल. आतापर्यंत जाहीर झालेल्या निकालांनुसार, बीएनपी आणि त्यांच्यासह असलेल्या पक्षांनी २८४ मतदारसंघापैकी २०८ मतदार संघांमध्ये आघाडी घेतली आहे. हा प्रचंड मोठा जनादेश असल्याचं वर्णन बीएपीने केलं आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी पक्षाचे अध्यक्ष तारिक रहमान यांचं अभिनंदन केलं. तसंच, बांगलादेशाबरोबर द्विपक्षीय संबंध मजबूत करण्यासाठी आणि विकासाची सामायिक उद्दिष्ट साध्य करण्यासाठी उत्सुक असल्याचं प्रधानमंत्र्यांनी म्हटलं आहे.

**<><><><><>**

माजी केंद्रीय कृषी राज्यमंत्री आणि  रेल्वेमंत्री कान्हू चरण लेंका यांचं  आज सकाळी भुवनेश्वर इथं  निधन झालं.  ते ८६ वर्षांचे होते. कान्हू चरण लेंका यांनी १९८८ ते

१९९४ पर्यंत राज्यसभेत ओडिशाचं प्रतिनिधित्व केलं होतं. चौद्वार मतदारसंघातून ते चार वेळा ओडिशाच्या विधानसभेवर निवडून आले होते. तसंच ओडिशाच्या प्रदेश काँग्रेस समितीचे अध्यक्ष म्हणूनही त्यांनी काम केलं होतं.

**<><><><><>**

हिमाचलप्रदेशात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूका घेण्यासाठी उच्च न्यायालयाने राज्य सरकारला दिलेली ३० एप्रिलपर्यंतची मुदत सर्वोच्च न्यायालयाने ३१ मे पर्यंत वाढवली आहे. उच्च न्यायालयाच्या निकालावर राज्य सरकारच्या मुख्य सचिवांनी केलेल्या याचिकेची दखल घेऊन सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश न्यायमूर्ती सूर्यकांत आणि न्यायमूर्ती जोयमाल्या बागची यांनी हा निर्णय दिला आहे. प्रभागांची पुनर्रचना आणि आरक्षण अंतिम करण्यासाठी उच्च न्यायालयाने २८ फेब्रुवारीपर्यंत दिलेली मुदतदेखील सर्वोच्च न्यायालयाने ३१ मार्च पर्यंत वाढवली आहे.

**<><><><><>**

बंगळुरूमध्ये होस्कोट तालुक्यातल्या एम. सत्यवरा गावाजवळ आज सकाळी झालेल्या एका रस्ते अपघातात सात जणांचा मृत्यू झाला. होस्कोट-दबासपेटे या राष्ट्रीय महामार्गावर कार, मोटारसायकल आणि कॅन्टर ट्रक एकमेकाला धडकल्यानं हा अपघात झाला. या अपघातात कारमधले सहा प्रवासी आणि दुचाकीस्वाराचा जागीच मृत्यू झाला.

**<><><><><>**

आंध्र प्रदेशातल्या चित्तूरच्या इरावराम जंक्शनजवळ आज सकाळी झालेल्या रस्ते अपघातात एका ३१ वर्षीय सॉफ्टवेअर इंजिनिअरचा मृत्यू झाला. तर तीन जण जखमी झाले. पलामनेरकडे जाणारा एका कंटेनर ट्रक कारवर उलटल्यानं हा अपघात झाला.

**//<><><><><>//**